**ठळक बातम्या**

- लोकसभा निवडणुकीच्या तिसऱ्या टप्प्यातल्या उमेदवारी अर्जांची आज छाननी

- शिवसेनेकडून औरंगाबादमधून संदीपान भुमरे यांना लोकसभा निवडणुकीसाठी उमेदवारी जाहीर

- देशातल्या लोकशाहीकडे जगभराचं लक्ष असल्याचं प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं नांदेडमधल्या प्रचारसभेत प्रतिपादन

**आणि**

- मुंबई विमानतळावर सीमाशुल्क विभागाकडून या आठवड्यात सुमारे साडे ९ किलो सोनं जप्त, ८ जणांना अटक

<><><><><><>

लोकसभा निवडणुकांच्या तिसऱ्या टप्प्यासाठी अर्जांची छाननी आज होत आहे. अर्ज दाखल करण्याची मुदत काल संपली.

**लातूर** लोकसभा मतदारसंघात ३६ व्यक्तींनी दाखल केलेल्या ५० अर्जांपैकी छाननीत ५ अवैध ठरली असून ३१ व्यक्तींचे अर्ज वैध ठरले आहेत.

**सातारा** लोकसभेसाठी एकूण २४ उमेदवारांनी अर्ज दाखल केले होते. आज केलेल्या छाननीमध्ये २१ उमेदवारांचे अर्ज वैध तर ३ उमेदवारांचे अर्ज अवैध ठरल्याची माहिती जिल्हा निवडणूक अधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिली आहे.

**रायगड** लोकसभा मतदारसंघाच्या निवडणुकीसाठी एकूण २८ उमेदवारांनी ४० अर्ज दाखल केले होते. आज पार पडलेल्या छाननी प्रक्रियेत २१ उमेदवारांची

२७ अर्ज वैध ठरले असून ७ उमेदवारांचे १३ अर्ज अवैध ठरल्याची माहिती निवडणूक निर्णय अधिकारी किशन जावळे यांनी दिली आहे.

**रत्नागिरी-सिंधुदुर्ग** लोकसभा मतदारसंघात सादर झालेल्या उमेदवारी अर्जांच्या छाननीत सर्व उमेदवारांचे अर्ज वैध ठरले आहेत. या मतदारसंघात एकूण नऊ उमेदवारांनी १३ अर्ज दाखल केले आहेत.

तिसऱ्या टप्प्यात होत असलेल्या निवडणुकांसाठी येत्या सोमवारी  दुपारी 3 वाजेपर्यंत अर्ज पत्र मागे घेता येणार आहेत. या टप्प्यात  राज्यातल्या लोकसभेच्या ११ जागांसह देशातल्या एकूण ९४ जागांसाठी येत्या ७ मे रोजी मतदान होणार आहे.

**<><><><><><>**

लोकसभा निवडणुकांच्या चौथ्या टप्प्यासाठी अर्ज दाखल करण्याची प्रक्रिया सुरू आहे.

**बीड** लोकसभा निवडणुकीत आज अर्ज भरण्याच्या तिसऱ्या दिवशी दुपारी तीन वाजेपर्यंत ११ उमेदवारांनी २५ अर्ज घेतले आहेत. पहिल्या दिवशी ३९ उमेदवारांनी ९२ अर्ज घेतले हाेते. दुसऱ्या दिवशी ३० उमेदवारांनी ६८ अर्ज घेतले हाेते. या तीन दिवसात एकूण ८० उमेदवारांनी १८५ अर्ज घेतले आहेत.

**औरंगाबाद** लोकसभा मतदार संघात आज ४ उमेदवारी अर्ज दाखल झाले. दिवसभरात १० उमेदवारांच्या नावाने १४ अर्ज घेतले असून आतापर्यंत ९५ जणांनी एकूण १८५ अर्ज घेतले आहेत.

**अहमदनगर** लोकसभा मतदारसंघात आज ९ जणांना २२ नामनिर्देशन पत्रांचं वितरण करण्यात आलं.

**जालना** लोकसभेच्या सार्वत्रिक निवडणुकीकरिता आज तिसऱ्या दिवशी ७ जणांनी १७ नामनिर्देशन पत्र घेतली आहेत.

चौथ्या टप्प्यात लोकसभेच्या ९६ जागांसाठी ९ राज्य आणि एका केंद्रशासित प्रदेशात १३ मे रोजी मतदान होणार आहे. त्यात राज्यातल्या ११ जागांचा समावेश आहे.

**<><><><><><>**

लोकसभा निवडणुकीच्या पहिल्या टप्प्यात काल महाराष्ट्रातल्या **भंडारा - गोंदिया, चंद्रपूर, गडचिरोली-चिमूर, नागपूर आणि रामटेक** या पाच मतदारसंघांसाठी अंदाजे सरासरी ६३ पूर्णांक २५ शतांश टक्के मतदान झालं. **गडचिरोली-चिमूर** मतदार संघात सर्वाधिक ७१ पूर्णांक ६१ टक्के, तर नागपूर मतदारसंघात सर्वात कमी ५४ पूर्णांक ४९ टक्के मतदानाची नोंद झाली.

**भंडारा - गोंदिया** मतदार संघात ६४ पूर्णांक ७२ टक्के, चंद्रपूरमध्ये ६७ पूर्णांक ५७ शतांश टक्के, तर रामटेक मतदारसंघात ६१ टक्के मतदानाची नोंद झाली.

या टप्प्यात नितीन गडकरी, सुधीर मुनगंटीवार, प्रतिभा धानोरकर, राजू पारवे, श्यामकुमार बर्वे, सुनील मेंढे, प्रशांत पडोळे, अशोक नेते, नामदेव किरसान या प्रमुख नेत्यांसह एकूण ९७ उमेदवारांचं भवितव्य मतदान यंत्रात बंद झालं आहे**.**

**<><><><><><>**

देशभरात ८५ वर्षांपेक्षा जास्त वय असलेले ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांगत्वाचं प्रमाण ४० टक्क्यापेक्षा जास्त असलेल्या मतदारांसाठी केंद्रीय निवडणूक आयोगानं घरुनच मतदान करण्याची संधी उपलब्ध करून दिली आहे. त्यासाठी १२ ड हा अर्ज भरुन द्यावा लागतो. गडचिरोलीतल्या १ हजार ४३८ मतदारांनी या सुविधेसाठी नोंदणी केली होती. घरुनच मतदान करण्याची संधी

असली तरी ती ऐच्छिक आहे. त्यामुळेच १११ वर्ष वय असलेल्या फुलमती सरकार यांनी मतदान केंद्रावर जाऊनच मतदानाचा अधिकार बजावला. फुलमती या मुलचेरा तालुक्यातल्या गोविंदपूर इथल्या रहिवासी. मतदान केंद्रावर जाऊनच मतदान करण्याच्या प्रबळ इच्छेनं, त्यांनी घरूनच मतदान करण्याची संधी नाकारली, आणि काल प्रत्यक्ष मतदान केंद्रावर येत आपला मताधिकार बजावला. अर्थात प्रत्येक मतदान केंद्रांवर ज्येष्ठ नागरिक आणि दिव्यांगांच्या सहकार्यासाठी असलेल्या स्वयंसेवक त्यांचा आधारही झाले.

**<><><><><>**

औरंगाबाद लोकसभा मतदारसंघातून शिवसेनेनं राज्याचे रोजगार हमी आणि फलोत्पादन मंत्री संदीपान भुमरे यांना उमेदवारी दिली आहे. सुधीर मुनगंटीवार यांच्यानंतर लोकसभेच्या रिंगणात उतरलेले ते राज्यातले दुसरे मंत्री आहेत. त्यांच्या विरोधात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षानं माजी खासदार चंद्रकांत खैरे रिंगणात आहेत. गेल्यावेळी MIM च्या इम्तियाज जलील यांनी त्यांना पराभूत केलं होतं. जलील यावेळीही निवडणूक रिंगणात आहेत. वंचित बहुजन आघाडीनं औरंगाबादमधून अफसर खान यांची उमेदवारी जाहीर केली आहे. महाविकास आघाडीनं आतापर्यंत ४६ जागांवरचे उमेदवार जाहीर केले आहेत. काँग्रेसच्या वाट्याला आलेल्या **उत्तर मुंबई आणि उत्तर मध्य मुंबई** या लोकसभा मतदार संघातले उमेदवार अजून जाहीर व्हायचे आहेत. महायुतीनं आतापर्यंत ४२ जागांवर उमेदवार जाहीर केले आहेत. त्यात भाजपा २६, शिवसेना ११, राष्ट्रवादी काँग्रेस ४ आणि महादेव जानकर यांच्या राष्ट्रीय समाज पक्षाला एक जागा मिळाली आहे. **उत्तर मध्य मुंबई, वायव्य मुंबई, दक्षिण मुंबई, नाशिक, पालघर आणि ठाण्यातल्या** उमेदवारांची अधिकृत घोषणा व्हायची आहे. या सर्व जागांवर

शेवटच्या टप्प्यात २० मे रोजी मतदान होणार असून अर्ज भरायची सुरुवात २६ एप्रिल रोजी होईल.

**<><><><><>**

भारतातल्या मजबूत लोकशाहीकडे संपूर्ण जगाचे लक्ष असून लोकशाहीत मतदान ही सर्वात मोठी ताकद आहे. त्यामुळे देशात होत असलेल्या लोकसभेच्या निवडणुकीत सर्वांनी मतदान करण्याचं आवाहन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी केलं आहे. ते आज नांदेड इथं निवडणूक प्रचारसभेत बोलत होते. पहिल्या टप्प्यातल्या मतदानाबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केलं. काँग्रेसने आपल्या कार्यकाळात दलित, गरीब यांच्याकडे दुर्लक्षच केल्याचा आरोप त्यांनी केला. येत्या पाच वर्षांत देशात विकास घडवून आणण्यासाठी आपण वचनबद्ध असल्याचा पुनरुच्चारही त्यांनी केला. यानंतर त्यांनी **परभणी** इथंही प्रचारसभा घेतली. गेल्या दशकात झालेल्या समावेशक विकासानुसार ‘सबका साथ सबका विकास’ सार्थ ठरवण्यासाठी आपलं सरकार वचनबद्ध असल्याचं ते म्हणाले.

**<><><><><>**

मुंबई विमानतळावर सीमाशुल्क विभागानं सुमारे साडेनऊ किलो सोनं जप्त केलं आहे. त्याचं मूल्य सुमारे ५ कोटी ७१ लाख इतकं आहे. १५ ते १८ एप्रिल दरम्यान १४ विविध प्रकरणांत ही कारवाई करण्यात आली असून आतापर्यंत ८ जणांना अटक झाली आहे. हे सोनं २ भारतीय नागरीक आणि परदेशी नागरीकांना अडवून जप्त करण्यात आलं आहे.

**<><><><><>**

श्रोतेहो, राज्यातल्या लोकसभा मतदारसंघातले उमेदवार, निवडणूक लढवण्यामागची त्यांची भूमिका, स्थानिक राजकारण यांचा आढावा घेणारा

‘लोकनिर्णय महाराष्ट्राचा’ हा कार्यक्रम, आकाशवाणीनं सुरू केला आहे. कार्यक्रमाच्या आजच्या भागात आपण आज रत्नागिरी-सिंधुदुर्ग आणि उद्या रायगड लोकसभा मतदार संघाचा आढावा घेणार आहोत. संध्याकाळी सव्वा सात ते साडे सात वाजेपर्यंत आकाशवाणी मुंबईच्या अस्मिता वाहिनीवर आणि समाज माध्यमांवर हा कार्यक्रम ऐकता येईल.

<><><><><>

राज्याच्या विविध भागात आजही पाऊस झाला. लातूर शहर आणि परीसरात आज दुपारी वादळी वाऱ्यासह मुसळधार पाऊस झाला. काही ठिकाणी गारपीटही झाली. सुमारे तासभर चाललेल्या पावसाने अनेक ठिकाणी वीज पुरवठा खंडीत झाला. सोलापूर जिल्ह्यात आज संध्याकाळी झालेल्या वादळी पावसामुळे रस्त्यावर पाणी साचले तसचं पाण्याचा प्रवाह वाढल्यानं अक्कलकोट तालुक्यात बासलेगाव गरोळगी किनी या २ गावांचा संपर्क तुटला आहे. नांदेड शहर आणि परिसरात आज संध्याकाळी सोसाट्याच्या वाऱ्यामुळे धुळीचे वादळ आणि नंतर मध्यम स्वरूपाचा पाऊस झाला.

<><><><><>

आयपीएल टी ट्वेंटी क्रिकेट स्पर्धेत आज दिल्लीतल्या अरुण जेटली मैदानावर थोड्याच वेळात म्हणजे साडेसात वाजता दिल्ली कॅपीटल्स आणि सनरायझर्स हैद्राबाद यांच्यातल्या सामन्याला सुरुवात होईल.

या सामन्यात दिल्ली कॅपीटल्स नं नाणेफेक जिंकून प्रथम क्षेत्ररक्षण करायचा निर्णय घेतला आहे.

<><><><><>

येत्या २-३ दिवसात मराठवाडा मध्य महाराष्ट्रात तुरळक ठिकाणी पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागानं वर्तवला आहे. मराठवाड्यात तुरळक ठिकाणी मेघगर्जना आणि विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं वर्तवली आहे.

**//<><><><><><>//**